# सौचेतकल्प

## ई-दिवाळी-अंक २०२४



गोखले एज्युकेशन सोसायटीचे

## सर डॉ. मो. स. गोसावी पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट

नाशिकरोड, नाशिक - ४२२ १०१



# श्री महागणपती स्तोत्र





श्री गणेशाय नमः ।। नारद उवाच ।।

प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकं ।।

भक्तावासं स्मरेन्नित्यं आयु:कामार्थसिध्दये ।। १ ।।

प्रथमं वक्रतुण्डं च एकदन्तं द्वितीयकम् ।।

तृतीयं कृष्णपिङ्गाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम् ।। २ ।।

लंबोदरं पञ्चमं च षष्ठं विकटमेव च ।।

सप्तमं विघ्नराजेन्द्रं धूम्रवर्णं तथाष्टमम् ।। ३ ।।

नवमं भालचन्द्रं च दशमं तु विनायकम् ।।

एकादशं गणपतिं द्वादशम् तु गजाननं ।। ४ ।।

द्वादशैतानी नामानि त्रिसंध्य यः पठेन्नरः ।।

न च विघ्नभयं तस्य सर्वसिध्दिकरं प्रभो ।। ५ ।।

विद्यार्थी लभते विद्या धनार्थी लभते धनं ।।

पुत्रार्थी लभते पुत्रान्मोक्षार्थी लभते गतिन् ।। ६ ।।

जपेद् गणपतिस्तोत्रं षडभिमासैः फलम् लभेत् ।।

संवत्सरेण सिध्दिं च लभते नात्र संशयः ।। ७ ।।

अष्टभ्यो ब्राह्मणेभ्यश्च लिखित्वा यः समर्पयेत् ।।

तस्य विद्या भवेत्सर्वा गणेशस्य प्रसादतः ।। ८ ।।

इति श्रीनारदपुराणे संकटनाशनस्तोत्रं संपूर्णम् ।।





**Namdar Gopal Krishna Gokhale**
After whom our Society is named



**Prin. T. A. Kulkarni**
Founder of Gokhale Education Society



**Late Prin. S. B. Pandit**
Former President
G. E. Society




**Late Sir Dr. M. S. Gosavi**
Former Secretary and Director
General: G. E. Society



**Late Dr. Mrs. S. M. Gosavi**
Former Principal of SMRK, AK, BK,
Mahila Mahavidyalaya G. E. Society



**Dr. Mrs. D. P. Deshpande**
Secretary, Director (HR) and Treasurer
G. E. Society, Nashik




**Dr. R. P. Deshpande**
President
G. E. Society, Nashik



**Prin. Dr. R. M. Kulkarni**
Zonal Secretary
G. E. Society, Nashik



**Mr. P. M. Deshpande**
Director (Project)
G. E. Society, Nashik



**Mr. S. M. Gosavi**
Director (Establishment)
G. E. Society, Nashik





**A LEAD & QUALITY EDUCATIONAL ENTERPRISE**

- **ESTABLISHED IN 1918. NINETY FIVE YEARS OF QUALITY SERVICE.**
- **THREE ZONES – NASHIK, MUMBAI & THANE WITH 17 CENTRES AND 121 INSTITUTIONS.**
- **1,25,000 PUPILES, 4000 STAFF, CURRENT BUDGET RS. 160 CRORES.**
- **ALL COLLEGES AND SCHOOLS ARE ISO 9001:2000 CERTIFIED.**
- **THE SOCIETY IS KNOWN FOR STUDENTS' DISCIPLINE, ACADEMIC EXCELLENCE, PROFESSIONAL COMPETENCE AND INNOVATIVE PROGRAMMERS WITH A TRACK RECORD OF STUDENTS AND STAFF ACHIEVEMENTS.**
- **SOCIETY'S COLLEGES HAVE PERMANENT AFFILIATION AND RECOGNITION FOR PH.D. PROGRAMMES.**
- **INTERNATIONALLY KNOWN FOR MAKING HIGHER AND TECHNICAL EDUCATION ENTREPRENEURIAL INNOVATIVE AND REWARDING THROUGH THIS NASIK CENTRE (CERTIFIED AT 44TH INTERNATIONAL CONFERENCE- UNIVERSITY OF TWENTE, NETHERLAND- HOLLAND.**

**PIONEERING WORKS**

- **ESTABLISHED FIRST AGRICULTURE SCHOOL FOR ADIVASIS IN INDIA, 1920 AT BORDI, DIST. THANE.**
- **ESTABLISHED FIRST UNIVERSITY BASED MBA PROGRAMME IN INDIA, 1968 AT NASHIK UNDER POONA UNIVERSITY.**
- **FIRST KRISHI VIDYNAN KENDRA IN INDIA, 1975 AT KOSBAD, DIST. THANE.**
- **FIRST VOCATIONALISATION OF UNIVERSITY DEGREE IN INDIA, 1983 AT BYKCOLLEGE, NASIK.**
- **PACE SETTING EXPERIMENT AT NATIONAL LEVEL- HINDUSTAN AERONAUTICAL LTD. – HAL:GES AGREEMENT FOR SCHOOL & COLLEGE COMPLEX SINCE 1970 AT OZAR, DIST. NASIK.**



Gokhale Education Society's

# SIR DR. M. S. GOSAVI POLYTECHNIC INSTITUTE,

Nashik Road, Nashik- 422 101

## VISION

- *To Empower the youth with competencies for Smart Performance.*
- *To Nurture Value – Oriented Skilled Manpower thro' Quality Technical Education.*
- *To Achieve Excellence in Capacity Building.*

## MISSION

- *To Impart High Quality Skill-based Technical Vocational Education to Suit Changing Times.*
- *To Provide Opportunities for Inter-disciplinary Learning to Meet Global Challenges.*
- *To Build Technical Competencies for, "Manufacturing In India"*



## संपादकीय समिती



**मुख्य संपादक**
प्रा. प्रदीप देशपांडे
**संचालक**

**कार्यकारी संपादक**
श्री. शैलेश गोसावी
**आस्थापना संचालक**

**शैक्षणिक संपादिका**
डॉ. सौ. श्रद्धा देशपांडे
**प्राचार्या**

**समन्वयिका**
सह. प्रा. सौ. गौरी बोराडे
**ग्रंथपाल**

**सहकार्य**
श्री. प्रथमेश शिंदे
**लिपीक**

सदर अंकाच्या लेखांमधील विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. हि मते त्या त्या लेखकांची आहेत.





# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक | नाव | वर्ग | पान क्र. |
|---|---|---|---|---|
| 1 | From Principals' Desk | Dr. S. P. Deshpande | Principal | 9 |
| 2 | Preaface | Asst. Prof. G. P. Borade | Librarian | 10 |
| 3 | संचितकल्प बद्दल........ | प्रा. आनंद पंचाक्षरी | Workshop Suprintendent | 11 |
| 4 | Diwali shopping guide: top gadgets and appliances | Prof. Sonal More | Lecturer, Chemistry | 13-14 |
| 5 | Diwali | - | - | 15-16 |
| 6 | मराठीतील बोलीभाषा | - | - | 17-18 |
| 7 | आजचे युवा, उद्याचे भविष्य | श्री. प्रथमेश शिंदे | Jr. Clerk | 19 |
| 8 | आई......... तुझ्याविन काहिच नाही.. | अदिती बुवा | SYEE | 21 |
| 9 | नातीगोती | मनश्री वाघ | FYME | 22 |
| 10 | For....... | Manashri Wagh | FYME | 23 |
| 11 | Your Best | Akshada Jadhav | TYCO | 23 |
| 12 | Octobers Twists | Vedant Rasal | FYCO | 24 |
| 13 | Diary of unborn baby girl | Manashri Wagh | FYME | 24-25 |
| 14 | स्त्री..... | अव्दिती बंड | SYEE | 26 |
| 15 | बाबा | पूर्वा सांगोरे | SYEE | 26 |
| 16 | आयुष्य | अव्दिती बंड | SYEE | 27 |
| 17 | M-O-N-E-Y | Manashri Wagh | FYME | 29 |
| 18 | Shayari | Piyush Kohli | SYME | 29 |
| 19 | चारोळ्या | तनुश्री वंजारे | SYEE | 30 |
| 20 | मैत्री | पूर्वा सांगोरे | SYEE | 30 |
| 21 | दिवाळी....... | शार्दुल हातोळकर | - | 31 |
| 22 | निसर्ग छायाचित्रे | Purva Sangore, Tanudhree Wanjare, Kartik Dahake, Akshada Jadhav, Mahashri Wagh, Pradnya Wagh, Mr. Prathamesh Shinde, Ms. Priyanka Pagare, Mrs. Gauri Borade, Aditi Buwa | - | 33-39 |
| 23 | रेखाटने | Sneha Deshmukh, Pradnya Wagh | - | 41-42 |
| 24 | About Sketch | - | - | 43 |
| 25 | पाककृती | प्रा. सोनल रविराव मोरे, मनश्री वाघ | - | 45-46 |
| 26 | दिवाळीचे महत्व | सह. प्रा. सौ. गौरी बोराडे | Librarian | 47 |



**From Principals' Desk………**

Dear Students, Staff, and Parents,

It gives me immense pleasure to present the ***'Sanchitkalp'*** third edition of E-Diwali Magazine 2024 to you. This year marks the Third publication of the E-Diwali Magazine 2024. Since last two years, in carrying out this role, I have been fortunate to receive invaluable guidance from the former Secretary of the institution, the late Sir Dr. M. S. Gosavi. I am deeply grateful for the constant encouragement and support I have received from the our Gokhlae Education Society's Secretary, Treasurer and H. R. Dr. Deepti Deshpande, Project Director Prof. Pradeep Deshpande, and Administration Director Mr. Shailesh Gosavi.

This edition of our magazine not only celebrates the spirit of Diwali but also highlights the hard work, creativity, and collaboration of our students and staff. It is a testament to the vibrant energy of our institute community, where each one of us contributes to making our environment brighter, more inclusive, and more inspiring.

In this Diwali edition, we present a variety of articles, creative thoughts, and visuals of significant events. I believe this will enhance your knowledge and provide a unique experience of this sacred Diwali festival.

As we come together to celebrate, let us remember the deeper meaning of this festival: the light within us all that can overcome any challenge. May the festive season bring joy, peace, and prosperity to every home, and may we continue to work together with hope and determination in the year ahead.

**I extend my heartfelt Diwali wishes to all of you!!**



Dr. Mrs. Shraddha P. Deshpande
**Principal**





## Preaface

It is with immense joy and pleasure that we present the third edition of our Diwali magazine, ***"Sanchitkalp".*** Diwali, the festival of lights, brings with it an aura of hope, joy, and renewal. This sacred occasion is a reminder to embrace the light within ourselves and spread it to the world around us.

As we move forward, this edition marks another year of creativity, collaboration, and festive spirit. ***"Sanchitkalp"*** is more than just a collection of stories, poems, and articles — it is a vibrant reflection of our collective thoughts, ideas, and celebrations. Each page in this magazine is filled with the warmth of the season and the enthusiasm of all those who contributed, including our talented students and staff members.

This year's edition brings you a rich tapestry of festive content, ranging from insightful articles to creative expressions and heartwarming stories that capture the essence of Diwali. We are thrilled to see our readers and contributors share their thoughts and experiences, further strengthening the bond that unites us all during this beautiful time of the year.

On behalf of the editorial team, I extend my heartfelt gratitude to everyone who made this edition possible. May this Diwali light up your lives with happiness, prosperity, and success, and may ***"Sanchitkalp"*** inspire you to continue spreading the light of knowledge, worship, and unity.

**Wishing you all a joyful and prosperous Diwali!**



Asst. Prof. Mrs. Gauri P. Borade
**Librarian**
**& Co ordinator of Magazine**





नमस्कार वाचक मित्रांनो,

दिवाळीच्या निमित्ताने हा ***"संचितकल्प"*** दिवाळी अंक प्रकाशित होत असताना मला असे सुचले की ***"संचितकल्प"*** या शब्दाचा अर्थ काय बर असेल?

वर्षभरामध्ये आपण ज्या गोष्टींची कल्पना केलेली असते आणि अशा अनेक कल्पनांचा संचय आपल्याकडे झालेला असतो तोच खरा ***"संचितकल्प"***. सर्व कल्पनांना वाव देण्यासाठी काहीतरी निमित्त पाहिजे की नाही. मग दिवाळी सणासारखे उत्तम असे कारण नाही. जर आपल्या कल्पनांना निसर्गाची सांगड मिळाली तर त्यांना नवीन क्षितीज मिळते. उत्सव आणि निसर्ग यांचा मिलाप जर घडून आला तर मनुष्यास जे हवे आहे ते त्यास अधिक स्वरूपात मिळते व त्याचे जीवन सुखकर बनते. कल्पना करणे हे मनुष्यास मिळालेले असे एक वरदान आहे की त्यास वयाचे कुठलेही बंधन नाही. लहान वयातील कल्पना जश्या बाळ बोधं असतात तश्यास त्या तारूण्यात उत्साही वाटतात आणि त्याच उतार वयात मात्र परिपक्व झाल्यासारख्या वाटतात. शेवटी महत्वाचे काय तर कल्पनेत जगणे आणि त्याचा संचय करीत रहाणे. आज पर्यंत असे अनेक वेळा सिद्ध झाले की कल्पनेच्या सहायाने वास्तविक जीवन सुसह्य झाले आहे.


म्हणून कल्पनेतून साकरलेल्या अनेक कलाकृती ह्या कौतुकास पात्र असतात.

या अंकातील अनेक काव्य, लेख हे कल्पनेतुनच मांडलेले आहे म्हणुन या मासिकास ***"संचितकल्प"*** हे शिर्षक योग्य ठरले आहे.

आपण विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना गत तीन वर्षांपासून सदर ***"संचितकल्प"*** हे मासिक त्यांच्या कल्पनांना चालना देण्यासाठी उपलब्ध करून दिलेले आहे. सर्वांचा असाच उत्साह दर वर्षी आपण अनुभवतो आहोत. लेखक, कवी, छायाचित्रणकार असे अनेक चेहरे आपणांसमोर या निमित्ताने येत आहेत.

सर्व सहभागींचे खूप खूप धन्यवाद! व सर्व वाचकांस पुढील अंकात सहभाग घेण्यासाठी आवाहन!!

**आपणा सर्वांस दिपावलीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!!!**



**प्रा. आनंद पंचाक्षरी**

**यांत्रिकी अभियांत्रिकी**




सदर पहिले
लेख





# Diwali shopping guide: top gadgets and appliances

Diwali festival brings a sense of newness, joy, and excitement, with family gatherings, celebrations, gifts, and plenty of shopping. This is a popular time for shopping in India, with big sales starting from Navratri and lasting through Bhaidooj. Diwali also marks the start of winter, and many stores offer great discounts and deals. It's the perfect time to explore and buy useful gadgets and appliances, with amazing offers available throughout the festive season! so we buy various useful gadgets.

**1. Laptop & Tablets**

Laptops, tablets, and ipads are great purchases during the festive season, with top brands offering exciting deals during Diwali sales. Tablets and iPads, in particular, are popular due to their convenience and versatility—they can easily connect to your phone, are portable for office work, and are beneficial for younger kids, thanks to parental control features.

**2. Smart Phones**

People are greatly attracted to smartphones, as they have become essential for managing almost everything—work, finances, transactions, and capturing memories through photos, videos, and audio—all with a single device. This makes smartphones a necessity, and Diwali is a great time to buy one with exciting offers and deals available in the market. Whether you looking for an expensive model or something within your budget, top brands offer fantastic options during this festive season.

**3. Heaters & Air Purifiers**

Heaters and air purifiers are great purchases during this time as winter approaches. Oil heaters are better than traditional ones for efficiently warming up your space. Air purifiers help cleanse the air in your home, ensuring you breathe purified air. Humidifiers are also beneficial in areas where humidity levels are high, helping to maintain a comfortable indoor environment. Top brands for oil heaters: Morphy-Richards, Havells, Bajaj Top brands for air purifiers: Philips, Honeywell

**4. Smart Home with Automated Devices**

A smart home setup refers to a system where devices and appliances can be controlled remotely via the internet and a mobile device. This allows you to manage functions like lighting, temperature, cameras, and security using voice control or smartphone apps. Top Brands for Smart Home Devices: Amazon, Google, Philips

**6. Smart watches & Tech Rings**

Smart watches are also an excellent buy for health-conscious individuals. They not only track fitness but also offer features like heart rate monitoring and step counting. Samsung has introduced a new option with tech rings, which track your fitness and are easy to wear during exercise, keeping you updated on your health goals.

**5. Smart TV & Music Systems**

For music lovers, a music system is a great buy, and Diwali offers fantastic deals on these electronics. As our lifestyle becomes more tech-

driven, music systems have evolved with features like USB ports, AUX cable connectivity, and Bluetooth, making it easy to connect to mobile devices. There is no need for cassettes or DVDs anymore! Smart TVs are also a growing trend, with internet connectivity allowing seamless access to apps, streaming services, and even gaming. Gaming has been a big attraction, evolving from video games to PlayStation 5. Most brands offer deals or discounts during Diwali sales or the festive season, making it the perfect time to upgrade your home entertainment system.

### 6. Home Appliances

There are a variety of electronics available with high-tech and upgraded versions, and Diwali is the perfect time to upgrade home essentials like washing machines, dishwashers, refrigerators, wet & dry robotic vacuum cleaners, and air fryers. Modern tech devices not only save time but also reduce energy consumption.


### Conclusions

In this Article, we explore how Diwali sales bring a lot of enthusiasm for shopping and showcase some of the latest, beneficial electronics and appliances that make life easier. High- tech gadgets are increasing in the market, offering convenience and efficiency.

To protect yourself from financial burdens and safeguard your high-tech home, gadgets, and appliances, it's essential to consider home insurance. Home insurance not only covers your electronics, jewellery, and furniture but also provides protection against unfortunate natural calamities like earthquakes, floods, and fires, as well as man-made incidents like theft and robbery.



**Prof. Sonal More**
**Lecturer, Chemistry**







**Diwali**, one of the major religious festivals in Hinduism, Jainism, and Sikhism, lasting for five days from the 13th day of the dark half of the lunar month Ashvina to the second day of the light half of the lunar month Karttika. (The corresponding dates in the Gregorian calendar usually fall in late October and November.) The name is derived from the Sanskrit term *dipavali*, meaning "row of lights." The festival generally symbolizes the victory of light over darkness.

Observances of Diwali differ depending on region and tradition. Among Hindus the most widespread custom is the lighting of *diya*s (small earthenware lamps filled with oil) on the night of the new moon to invite the presence of Lakshmi, the goddess of wealth. In Bengal the goddess Kali is worshipped. In North India the festival also celebrates the royal homecoming of Rama (along with Sita, Lakshmana, and Hanuman) to the city of Ayodhya after defeating Ravana, the 10-headed king of the demons, thus connecting the festival with the holiday of Dussehra. In South India the festival marks Krishna's defeat of the demon Narakasura. Some celebrate Diwali as a commemoration of the marriage of Lakshmi and Vishnu, while others observe it as the birthday of Lakshmi.

During the festival, *diya*s are lit and placed in rows along the parapets of temples and houses and set adrift on rivers and streams. Homes are decorated, and floors inside and out are covered with *rangoli*s, consisting of elaborate designs made of colored rice, sand, or flower petals. The doors and windows of houses are kept open in the hope that Lakshmi will find her way inside and bless the residents with wealth and success.

Rangoli for DiwaliLines and lamps joining together in a *rangoli* for Diwali, the festival of lights.

The names and events of the individual days of Diwali are as follows:

The first day, known as Dhanteras, is dedicated to cleaning homes and purchasing small items of gold. Lakshmi is the focus of worship on that day. The second day, called Naraka Chaturdashi or Choti Diwali, commemorates Krishna's destruction of Narakasura; prayers are also offered for the souls of ancestors. On the third day, Lakshmi Puja, families seek blessings from Lakshmi to ensure their prosperity; light *diya*s, candles, and fireworks; and visit temples. It is the main day of the Diwali festival. The fourth day, known as Govardhan Puja, Balipratipada, or Annakut, is commemorating Krishna's feat of lifting up a mountain, Govardhan Hill, to protect the local cowherds in defiance of Indra, the king of the gods, who had sent a torrential rain upon them. It is also the first day of Karttika and the start of the new year in the Vikrama (Hindu) calendar. Merchants perform religious ceremonies and open new account books. The fifth day, called Bhai Dooj, Bhai Tika, or Bhai Bij, celebrates the bond between

brothers and sisters. On that day sisters pray for the success and well-being of their brothers, similar to the holiday Raksha Bandhan.

Diwali is generally a time for visiting, exchanging gifts, wearing new clothes, feasting, feeding the poor, and setting off fireworks (though such displays have been restricted to limit noise and other environmental pollution). Gambling, especially in the form of card games, is encouraged as a way of ensuring good luck in the coming year and in remembrance of the games of dice played by Shiva and Parvati on Mount Kailasa or similar contests between Radha and Krishna. Ritually, in honor of Lakshmi, the female player always wins.

Diwali is also an important festival in Jainism. For the Jain community, the festival commemorates the enlightenment and liberation (*moksha*) of Mahavira, the most recent of the Jain Tirthankaras, from the cycle of life and death (samsara). The lighting of the lamps celebrates the light of Mahavira's holy knowledge.

Since the 18th century, Diwali has been celebrated in Sikhism as the time of Guru Hargobind's return to Amritsar from captivity in Gwalior—an echo of Rama's return to Ayodhya. Residents of Amritsar light lamps throughout the city to celebrate the occasion.

Ref: https://www.britannica.com/topic/Diwali-Hindu-festival







# मराठीतील बोलीभाषा

भारत देशात मराठी भाषा बोलणारी माणसे जवळपास सगळ्या राज्यांत विखुरलेली आहेत.

जगाातील बहुतेक प्रमुख भाषांप्रमाणेच, मराठी भाषाही एकाहून अधिक पद्धतींनी बोलली जाते. मुख्य भाषेशी नाते कायम ठेवलेली, तिची बोलीभाषा दर १२ कोसांगणिक उच्चारांत, शब्दसंग्रहांत, आघातांत व वाक्प्रचारांम बदलत रहाते. असे असले तरी लिखित भाषेत फारसा फरक नसतो.

पिढ्या न् पिढ्या विशिष्ट राज्यात स्थायिक झाल्यामुळे मराठी भाषकांच्या यांच्या मूळ मराठी बोलीवर त्या राज्याच्या स्थानिक भाषेचा ठसा सुस्पष्टपणे उमटलेला असतो. त्यामुळे 'मी मराठी बोलतो' असे कुणी विधान केले तर 'कुठली मराठी बोलता?' असा प्रश्न आपोआपच उपस्थित होतो. कारण मूळ मराठी भाषेचे व्याकरण जरी एकच असले तरी स्थानमहात्म्यानुसार मराठी बोलीचे 'कोंकणी मराठी – (हीतही पाचदहा प्रकार आहेत), कोल्हापुरी मराठी, कारवारी मराठी, अहिराणी, मराठवाडी, नागपुरी असे अनेकविध प्रकार कानावर पडत असतात. ह्या प्रत्येक प्रकारात त्या त्या ठिकाणच्या स्थानिक लोकजीवनातले अनेक शब्द आलेले दिसतात, जे लहान शब्दकोषात सापडतीलच असे नाही. भौगोलिक परिसरानुसार कोल्हापुरी, चंदगडी, नागपुरी, कोंकणी, वऱ्हाडी, बेळगावी, मालवाणी, मोरस मराठी, झाडीबोली, तंजावर, नंदुरबारी, खाल्यांन्गी, वल्यांगी, तप्तांगी, डोंगरांगी, जामनेरी, खानदेशी असे बोलींचे आणखी उपप्रकार होतात.

**आदिवासी बोलीभाषा** – महाराष्ट्रात गोंड, भिल्ल, वारली, पावरी, मावची, कोरकू, कोलामी, कातकरी, माडिया आदी बोलीभाषा प्रमुख आहेत. या बोली भाषा महत्वाच्या असल्या तरी यापैकी गोंडी व भिल्ली या बोली भाषा अतिप्राचीन आहेत.

**मराठवाडी** – मराठवाडा प्रदेशात ही ठसकेबाज मराठी भाषा वापरली जाते. सहसा गावठी किंवा शिवराळपणा हे वैशिष्ट्य मराठवाड्यातल्या मराठी चे समजले जाते. लातूरी भाषेत 'लाव', 'आव' या स्वरुपाचे कारकवाचक प्रत्यय या बोलीचे वेगळेपण दाखवतात. उदा. जेवलाव, चाल्लाव, ठिवताव इ.

**मालवाणी** – दक्षिण रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात बोलली जाणारी ही बोली आहे. या बोलीस कुडाळी असेही म्हणतात. या बोलीत झिल (मुलगा), चेडू (मुलगी), घोव (नवरा) असे काही शब्द वापरले जातात. दशावतार या नाटकाचे सादरीकरण याच भाषेत केले जाते. मच्छिंद्र कांबळी यांच्या मालवाणी नाटकांमुळे ही भाषा जास्त प्रसिद्धीस आली.

**नागपुरी** – पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर जिल्ह्यांचे काही भाग आणि गडचिरोलीचा काही भग तसेच भंडारा (गोंदिया) या जिल्ह्यांत बोलली जाणारी नागपुरी ही काहीशी निराळी बोली आहे. यावर हिंदी शब्दांचाही प्रभाव आढळतो.

**अहिराणी** – जळगाव जिल्हा सावळदबारा, बुलढाणा, मलकापूर ते मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर, शहापूर, अंतुर्लीपर्यंतच्या विस्तृत भूप्रदेशात ही बोलीभाषा प्रचलित आहे. भालचंद्र नेमाडे, ना. धों. महानोर, के. नारखेडे या लेखकांनी या बोलीचा वापर आपल्या साहित्यात केलेला दिसतो.





**तावडी —** जामनेर, भुसावळ जळगाव, बांदवर, रावेर, यावल या भागांत तावडी बोली प्रचलित आहे. ‘क’ च्या जागी ‘ख’ चा उच्चार केला जातो. उदा. डोखं (डोकं). बहिणाबाईंच्या कवितांमधून तावडी बोलीचा आविष्कार दिसून येतो.

**आगरी —** महाराष्ट्र राज्याच्या उत्तर आणि मध्य कांकणात बोलली जाते. आगरामधले आगरी, गवळी व कुणबी तसेच किनारपट्टीवरील कोळी, खारवी भंडारी व भोई ही बोली बोलतात. रायगड आणि ठाणे या जिल्ह्यांमध्ये ही आगरी भाषा बोलणारे लोक प्रामुख्याने आढळतात.

**चंदगडी —** चंदगडच्या पूर्व भागात आणि बेळगाव परिसरातील गावांमध्ये कन्नड भाषेच्या प्रभावाने तयार झालेली ही बोली वापरत आहेत. या मध्ये ‘मिय्या जेवलो’ (मी जेवले), ‘मी बाजारास गेल्लो’ (मी बाजारात गेले) अशी शब्द रचना दिसते. तसेच ‘कोठे’ एवजी ‘खट्टे’ असा शब्द ऐकू येतो.


**वऱ्हाडी —** बुलढाणा, वाशिम, अकोला, यवतमाळ, अमरावती आणि वर्धा या सहा जिल्ह्यांतून वऱ्हाडी बोलली जाते. म्हाइंभट यांचा ‘लीळाचरित्र’ हा मराठीतील पहिला गद्यग्रंथ वऱ्हाडी बोलीत लिहिला गेला. प्रमाणा मराठीतील ‘ड’ चा ‘ळ’, ‘ळ’ चा ‘य’ या बोलीत केला जातो. तसेच जो प्रत्यय असलेली येईजो, देईजो, घेईजो अशी रूपे येतात.

**कोल्हापुरी —** बोलीभाषांपैकी कोल्हापुरी मराठी बोली ही निष्कपट, गरीब, खेडवळ, अशिक्षित शेतकऱ्याची बोली आहे. लय काढून बोलण्याची लकब या भागात आढळते. तसेच कोकणी भाषेचा प्रभाव यावर दिसतो. भाषेत रांगडेपणा व शिव्यांचा वापर आढळतो. अश्या रांगड्या भाषा अधिक रसरशीत, ठसकेबाज आणि दमदार वाटतात.

याचबरोबर देहवाली, बेळगावी, वाडवळी, कोंकणी, खानदेशी, तंजावर मराठी, नंदभाषा व नारायणपेठी बोली अश्या भाषाही मराठी भाषाच आहेत. यासाठी दिलेल्या दुव्याचा वापर आपण करू शकता.

**“लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी”**

Ref: https://marathiglobalvillage.com/marathi-bolibhasha/



# आजचे युवा, उद्याचे भविष्य

शिक्षण घेणे, योग्य त्या मुल्यांवर आणि तत्वांवर आयुष्य जगणे हा तारुण्याचा अविभाज्य घटक हवा. परंतु आजकाल घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये अर्धे गुन्हे टीनएजर्स म्हणजेच तरुणांकडून घडलेले असतात. करिअर घडविण्याच्या वयात धुम्रपान आणि नको त्या गोष्टींकडे वळून आपले आयुष्य बेजबाबदारपणे बरबाद करून तरुण पिढी उद्ध्वस्त होत आहे. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या विवेकानंदांच्या तत्वावर चालून आयुष्य असे जगावे की ज्याने आपल्यासोबत देशाचा विकासही होईल. तरुण हे देशाच्या विकासाचे आधारस्तंभ असतात. एका तरुणाने स्वत:च्या आयुष्यात प्रगती करणे म्हणजेच देशपातळीवर प्रगतीचा दर वाढणे. परंतु प्रगतीचा दर अपेक्षित तितका नाही आणि यामागे बरीच कारणे आहेत. पालकांनी आपले पाल्य घडविताना आपण देशाचे भविष्य घडवित आहोत ही बाब कायम लक्षात ठेवावी. आपल्या पाल्यावर करण्याचे संस्कार, त्यांना द्यावयाची योग्य अयोग्याची शिकवण ही जबाबदारीने दयावी. आज तुम्ही दिलेली शिकवण उद्याचा हा तरुण पिढयानपिढया पुढे नेणार आहे. परंतु याच शिकवणीमध्ये राहणारी कमतरता आणि या कमतरतेमुळे संगत निवडण्यात झालेली चूक यांमुळे तरुण वेगळया वळणावर जातात. गुन्हेगारी वृत्तीकडे त्यांचा कल चालला जातो. दररोजच बघितल्या जाणाऱ्या बातम्यांमध्ये तरुणांकडून घडणाऱ्या गुन्हयांचे प्रमाण सर्वाधिक असते.

चोरी, खुण, सायबर क्राईम, अशा कित्येक गुन्हयांमध्ये तरुणच दोषी असतात. त्यामध्ये गुन्हेगारी वृत्ती वाढण्यात कित्येकच घटक कारणीभूत असतात. आजूबाजूचे वातावरण, संगत, पालकांच्या मार्गदर्शनाची उणीव यांसारख्या कित्येक कारणांमुळे एक तरुण मार्ग भटकतो. स्वामी विवेकानंद हे आदर्श तरुण घडले यामागे त्यांच्या सदसदविवेकबुध्दीचा झालेला विकास, त्यांची वैचारिक प्रगल्भता, आयुष्यात रुजलेली मूल्ये यांचा वाटा होता. छत्रपती शिवाजी महाराज एक आदर्श पुत्र आणि आदर्श युवा घडले यामागे जिजामातांचे संस्कार होते. देशासाठी प्राण वाहून देणाऱ्या भगतसिंगांमध्ये देशभक्तीची मूल्ये होती. मूल्ये आणि संस्कार यांतून घडलेले हे तरुण आणि देशासाठी व जनतेसाठी केलेली कामगिरी चिरकाल टिकून राहीली. हे संस्कार आणि मूल्यांची गरज आजच्या तरुणाला आहे. योग्य त्या मार्गावर चालणारा तरुण देशाला प्रगतीच्या शिखरावर नेऊ शकतो.



**श्री. प्रथमेश शिंदे**
**लिपीक**




सदर दुसरे
कविता

## आई......... तुझ्याविन काहिच नाही..

आज म्हटलं स्वत:ला जाब विचारावा

आज म्हटलं स्वत:ला जरा जाब विचारावा

आईसाठी आपण काय करतो, आढावा घ्यावा

आपण पहाटे उठलो आणि आई दुपारी असं कधी घडलयं?

आपण जेचायच्या आधी, कधी आईचं ताट आपण कधी वाढलयं?

बरं तुम्ही घरी येतांना विनाकारण आईसाठी काय आणता

तुम्ही घरी येतांना आईसाठी काय आणता

बरं तुम्ही सांगा, तुमच्या स्वत:च्या आईचा फेवरेट कलर कोणता?

देवा आईला हवं ते मिळूदे, अशी प्रार्थना कधी केलीये?

पाहिलं का आई शेवटची कधी ऑनलाईन आलीये

तिच्या जन्मदिनाची पार्टी, तिच्या मैत्रिणींना आपण कधी देतो?

तिने केलेला पसारा आपण कधी आवरतो?

तरीही बाळाला कोणी बोलंल तर तिचं मन येतं भरून

आपण बोलताना मात्र विनाकारण शिव्या आईवरून

लक्षात ठेवून, बाळासाठी ती हात पसरते

कधी दैवापुढे, देवापुढे, नशिबापुढे,

लक्षात ठेवून ती बाळासाठी हात पसरते,

फक्त स्वत:ची बी.पी. ची गोळी घ्यायला मात्र विसरते

आईची आई होऊन बाळांनो कधी तरी वागा ना,

आईची आई होऊन बाळांनो कधी तरी वागा ना

तिचा खरबडा हात हातात घेऊन एकदा बघा ना

कितीही कतृत्व गाजवा तुम्ही झेप कमी पडते

आईने कडेवर घेतल्यावरच आपली उंची वाढते

उगाच कशाला अध्यात्म आणि श्रद्धेच्या गप्पा हाणता,

आईच्या पोटी जन्माला येता आणि देव कुठे आहे असं म्हणता

आईला सतत मुलांचा ध्यास आणि त्यांच्याच प्रेमाची धुंदी,

बाळांनी गंमत आणली नाही तरी आई सदा आनंदी

आई सदा आनंदी.....

नको कोणाशी स्पर्धा देवा, नको कोणाचा हेवा,

जग जिंकायचं ना मित्रांनो तर आईच्या पायावर डोकं ठेवा

जग जिंकायचं ना मित्रांनो तर आईच्या पायावर डोकं ठेवा.............



**. अदिती बुवा- SYEE**

## नातीगोती



जी माणसं हवीशी वाटतात,

ती माणसं भेटत नाही,

जी माणसं नकोशी वाटतात,

त्यांचा सहवास संपत नाही,

ज्यांच्याकडे जायला जमत नाही,

ज्यांच्याकडे जावु नये असं वाटतं,

त्यांच्याकडे जावच लागतं,

जेव्हा जीवन नकोस वाटतं,

तेव्हा काळ संपत नाही,

तेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळतो

तेव्हा काळ संपलेला असतो

नशीब हे असचं असत

त्याच्याशी जपून वागावं लागतं

जिथे नेईल तिकडे जावच लागतं



- मनश्री वाघ -FYME

सर डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतन, आहे ज्ञानाचा झरा,

"योग: कर्मसु कौशलम्" हा ध्येय मंत्र बाळगतो आम्ही उरा ।।

शिकतो योग्य मार्ग, मिळतो यशाचा ध्यास,

ज्ञानाच्या दृष्टीतून घेतो आम्ही जीवनाचा श्वास ।।

कष्टाचं महत्व शिकतो, आणि आत्मविश्वास वाढवतो,

कर्मभूमीत आमच्या प्राप्त ज्ञान रूजवितो ।।

गोसावी तंत्रनिकेतनचा ध्वज उंच फडकतो,

"योग: कर्मसु कौशलम्" ची शृंखला आम्ही रचतो ।।

सृजनशीलतेची जोपासणा, उत्कृष्ठतेकडे एक वाट,

येथील शिक्षकांच्या मार्गदर्शनाने उज्वल भविष्याचा घालतो घाट ।।





## For…




For for my dreams, I have to make them true For I have to do mistakes very few

For I have to fulfil the wishes of my mother

For that I have to not forget others

For my nation, I have to do something

For that I am ready to contribute everything

For I also have to considered my friends who are my dearest

For them I will give my best

And also to think of myself to achieve success

Also Fly high like a kite

For this I have to work day and night

For this I have to do this

For,…..Forever



- **Manshree Wagh – FYME**

## Your Best

If you always try your best

Then Your Best

Then you”ll never have to wonder

About what you could have done

If you’d summoned all your thunder.

And if your best

Was not as good

As you hoped it would be,

You still could say,

“I gave today All that I had in me”






- **Akshada Jadhav – TYCO**



## Octobers Twists

October comes with quiet chills,

And changes sneak through trees and hills.

Each day a new surprise unfolds,

Like stories only time can hold.

The sun gets shy, the nights grow long,

But something's different all along.

A twist, a turn, a hidden clue,

October always brings the new.

Hearts may change or plans may fall,

What's sure today, tomorrows' small.

This month keeps secrets deep inside,

In October's hands, we all ride



**- Vedant Rasal - FYCO**



## Diary of unborn baby girl



Diary of unborn baby girl

The day I bacame a live

In the womb of my mother

Every movement inside brought

Glee to my father

It was my mother who heard

My heartbeat first

But I think i was cursed....

After a few months's, I was very happy

Because we went for ultra scan

To check who I am? A girl or a boy?

But when they informed

That I was a girl

The necklace was broken and scattered

Were all the pearls

I was killed before I was born

But I am still alive in the spirits of my own

"Everyone likes to have a MOTHER,

A SISTER and a GIRLFRIEND

But why not a DAUGHTER?

The day I bacame a live

In the womb of my mother

Every movement inside brought

Glee to my father

It was my mother who heard

My heartbeat first

But I think i was cursed....

After a few months's, I was very happy

Because we went for ultra scan

To check who I am? A girl or a boy?

BDiary of unborn baby girl



The day I bacame a live

In the womb of my mother

Every movement inside brought

Glee to my father

It was my mother who heard

My heartbeat first

But I think i was cursed....

After a few months's, I was very happy

Because we went for ultra scan

To check who I am? A girl or a boy?

But when they informed

That I was a girl

The necklace was broken and scattered

Were all the pearls

I was killed before I was born

But I am still alive in the spirits of my own

"Everyone likes to have a MOTHER,

A SISTER and a GIRLFRIEND

But why not a DAUGHTER? ut when they informed

That I was a girl

The necklace was broken and scattered

Were all the pearls

I was killed before I was born

But I am still alive in the spirits of my own

"Everyone likes to have a MOTHER,

A SISTER and a GIRLFRIEND

But why not a DAUGHTER?



- **Manshree Wagh - FYME**

## स्त्री.....



ज्याला स्त्री आई म्हणून कळली
तो जिजाऊ चा शिवबा झाला
ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली
ते मुक्ताबाईचा ज्ञानदेव झाला
ज्याला स्त्री मैत्रीन म्हणून कळली
ते राधेचा श्याम झाला
आणि
ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली
ते सितेचा राम झाला....



**- अव्दिती बंड - SYEE**

## बाबा

काय गाऊ बाबा
तुमची अगणित महती
शब्द अपुरे पडतील
करण्यास तुमची स्तुती
तुम्हीच आमचे पालनकर्ता
तुम्हीच आमचे विघ्नहर्ता
तुम्हीच आमचे कैवारी
सगळया दु:खास तारी



तुम्हीच प्रेमाचा सागर
तुम्हीच दयेचा डोंगर
तुम्हीच मायेचा पाझर
आमचा एकमेव आधार

काय गाऊ बाबा
तुमची अगणित महती
शब्द अपुरे पडतील
करण्यास तुमची स्तुती



**- पूर्वा तुषार सांगोरे - SYEE**





## आयुष्य

आयुष्य हे विधात्याच्या वहीतील पान असत....

रिकामं तर रिकामं,

लिहिल तर छान असतं...

शेवटचं पान मृत्यू अनं

पहिल पान जन्म असतं....

मधली पाने आपणच भरायची,

कारण ते आपलंच कर्म असतं.....

होणाऱ्या चुकांना टाळायचं असतं,

कुठलचं पान कधी गाळायच नसतं....

कारण त्यातूनच

आपल्याला पुढे शिकायचं असतं....

नाती जपण्यात मजा आहे

बंध आयुष्याचे विणण्यात मजा आहे

जुळलेले सूर गाण्यात मजा आहे

येताना एकटे असलो तरी

सर्वांचे होऊन जाण्यात मजा आहे

नशीब कोणी दुसरं लिहित नसतं

आपलं नशीब आपल्याच हाती असतं

येताना काही आणायचं नसतं

जाताना काही न्यायचं नसतं

मग हे आयुष्य तरी

कोणासाठी जगायचं असतं

याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी

जन्माला यायचं असतं




आयुष्य हे विधात्याच्या वहीतील पान असत...... ही मंगेश पाडगांवकर यांची रचना मला अधिक भावली. म्हणून आपणासाठी या दिवाळी अंकाच्या माध्यमातून पोहचवत आहे. केवळ भावना नव्हे तर एक सत्य......



- अव्दिती बंड - SYEE


सदर तिसरे
चारोळ्या



## M-O-N-E-Y

Money is not everything in this world,

Money can buy looks but not knowledge,

Money can buy wealth but not happiness,

Money can buy scholars but not wisdom,

Money can buy servants but not respects,

Money can buy artists but not their talent,

Money can buy a temple but not god.



**- Manashri Wagh - FYME**



1)Nazar chahti hai deedar karna Dil chahta hai pyaar karna,

Kya batau iss dil ka aalam naseeb Mein likha hai intezar karna

◈◈◈

2)Ek hi nazar mein aap Hamare mehman bann gaye,
Do baatein kya krr liye Saara jahaan bann gaye,
Pass rehkar bhi log hume Apna bana naa paaye,
Durr rehkar bhi aap Hamare jaan bann gaye

◈◈◈

3)Nafrat mat karna humse Hum seh nhi payenge
Bss pyar se keh dena ache nhi lagte Phir kabhi najar nhi aayenge..!



**- Piyush Kohli - SYME**



१) जीत और हार,

अपनी सोच पर निर्भर करती है,

मान लो तो हार होगी.

और ठान लो तो **जीत** होगी।

२) माँ बाप की फिक्र को **फर्क** में बदलेंगे,

आज और अभी से हम

जी तोड मेहनत करेंगे।

३) हजारो माणसे मिळतील आयुष्यात

पण आपल्या हजारो चुकांना क्षमा करणारे

**आई वडिल**

पुन्हा मिळणार नाहीत.....

४) **मैत्री** करत असाल तर

दिव्यातल्या पणती सारखी करा

अंधारात जे प्रकाश देतील

हृदयात असं एक मंदिर करा.................



**— तनुश्री वंजारे — SYEE**

## मैत्री

रक्ताची नाती जन्माने मिळतात

मनलेली नाती मनाने जुळतात

पण नाती नसतानाही जी बंधन जुळतात

त्या रेशमी बंधनांना **मैत्री** म्हणतात....



**- पूर्वा सांगोरे — SYEE**


**समजावण्यापेक्षा समजून घेण्यामध्ये खरी परीक्षा असते, कारण समजवण्यासाठी अनुभवाचा कस लागतो, तर समजुन घेण्यासाठी मनाचा मोठेपणा लागतो.**

## दिवाळी.......

लोपला अंधार सारा,माखली तेजात नगरी
उजळले सारेच रस्ते, वाहती आनंदलहरी
लागले लाखो दिवेही, जाळण्या काळोख सारा
धुंद तो आला सुगंध, कुठुनसा घेऊन वारा
शोभतो आकाशकंदिल, टांगला उंचावरी
टाकला दारी सडाही, बांधले तोरण दारी
होई ते अभ्यंगस्नान, लावूनी उटने सुगंधी
तप्त ते पाणी पहाटे, चढविते न्यारीच धुंदी
बोचरी थंडी गुलाबी, फुलविते रोमांच अंगी
रांगोळी दारामधे ती, रंगुनी साऱ्याच रंगी
रोषणाई हा खरोखर, प्राण या दीपोत्सवचा
शुभशकुनी सोनकिरणे, नाश करिती दानवांचा
चाहती आबालवृध्द, गोड खाऱ्या त्या फराळा
वाढवी गोडी सणाची, मित्र नि आप्तांचा मेळा
काय मी वर्णु दिवाळी, सोहळा परमोच्च आहे
मानवाच्या संगतीने, देवसुद्धा वाट पाहे
जे भुकेले भोवताली, पोरके असती किती
वाटुया आनंद त्यांना, एवढी तुम्हा विनंती
एवढी तुम्हा विनंती....................

**- शार्दुल हातोळकर**





सदर
चौथे
निसर्गछायाचित्रे













**Purva Sangore**
**SYEE**




येता तुझ्या कुशीत निसर्गा
बेहद्द जगावेसे वाटले
उमलत्या नाजूक कळ्यांना
पाहून हसावेसे वाटले

तलम ओली माया मातीची
पात्यांशी बोलावेसे वाटले
हिरवा वारा हिरवे पक्षी
जंगल व्हावेसे वाटले

© संदीप राऊत ~वाचू आनंदे








Tanushree Wanjare
SYEE




Kartik Dahake
SYME














**Akshada Jadhav**
**TYCO**

> **"Nature always wears the colors of the spirit"**
>
> **– Ralph Waldo Emerson**



















**"In every walk with nature one receives far more than he seeks." — John Muir**



**Manashri Wagh**
**FYME**







विविधरंगांनी नटलेला निसर्ग अतिशय विलोभनिय दिसतो.........






**Pradnya Wagh**
**FYCO**





भूतलावरती या धूके पसरते चहूकडे,

माणवाने करता हस्तक्षेप, निसर्गालाही या टाहो फूटे.........

डोंगर रांगा खंडित करूनी आपला संसार थाटे,

अशी ही रचना करता धूकेही विरूनी जाते.................



**Prathamesh Shinde**
**Jr. Clerk**









**"Pets are humanizing. They remind us we have an obligation and responsibility to preserve and nurture and care for all life."**

**– James Cromwel**









**Priyanka Pagare**
**Jr. Clerk**











**निसर्गावर बोलू काही.........**

निसर्गाच्या सानिध्यात काही
काळ घालवावा, प्रकृतीच्या
उत्पत्तींना अनुभवावं आणि
सर्व सृष्टी सौंदर्य आपल्या
नेत्रांत साठवावं........



**Mrs. Gauri Borade**
**Librarian**



# निसर्गासारखा नाही रे सोयरा..

निसर्गासारखा नाही रे सोयरा
गुरू सखा बंधू मायबाप
त्याच्या कुशीमध्ये सारे व्यापताप
मिटती क्षणात आपोआप

त्याच्या संगतीत फिटतो संदेह
वितळतो क्षोभ माया मोह
त्याच्या संकीर्तनी मुरविता देह
भेटतो उजेड अंतर्बाह्य

त्याच्या स्मरणाने प्रकाशते मन
उजळते जग क्षणकाली
स्थिरावते पुन्हा चळलेले चित्त
पुन्हा मूळ वाट पायाखाली



**Aditi Buwa**
**SYEE**

Ref: https://poetryheals.in/best-marathi-poems-on-nature/


सदर पाचवे
रेखाटने













**Sneha Deshmuk**
**FYME**

**Do not fail, as you go on, to draw something every day, for no matter how little it is, it will be well worth while, and it will do you a world of good.**


\- **Cennino Cennini**














**Pradnya Wagh**
**FYCO**

**"The first things to study are form and values. For me, these are the things that are the basics of what is serious in art.**

**- Jean Baptiste Corot**

## Sketch- - - - -

Sketch, traditionally a rough drawing or painting in which an artist notes down his preliminary ideas for a work that will eventually be realized with greater precision and detail. The term also applies to brief creative pieces that per se may have artistic merit.

In a traditional sketch, the emphasis usually is laid on the general design and composition of the work and on overall feeling. Such a sketch is often intended for the artist's own guidance; but sometimes, in the context of a bottega (studio-shop) type of production, in which an artist would employ many assistants, sketches were made by the master for works to be completed by others. There are three main types of functional sketches. The first—sometimes known as a croquis—is intended to remind the artist of some scene or event he has seen and wishes to record in a more permanent form. The second—a pochade—is one in which he records, usually in colour, the atmospheric effects and general impressions of a landscape. The third type is related to portraiture and notes the look on a face, the turn of a head, or other physical characteristics of a prospective sitter.

From the 18th century, however, sketch came to take on a new meaning, which has almost come to supersede the traditional one. The emphasis on freshness and spontaneity, which was an integral part of the Romantic attitude, the fact that there was a great increase in the number of amateur artists, and the growing appreciation of nature, accompanied by an expansion of facilities for travel, transformed the sketch into something regarded as an end in itself—a slight and unpretentious picture, in some simple medium (pen and ink, pencil, wash, or watercolour) recording a visual experience. This led to a revaluation of sketches that had originally been created for other works. Contemporary taste, for instance, tends to value John Constable's sketches as highly as his finished works.

Ref: https://www.britannica.com/art/sketch-art


सदर सहावे
पाककृती

# रेसिपी - व्हेज स्प्रिंग रोल

**घटक**

२ वाटी मैदा, १/४ वाटी गरम तेलाचे मोहन, चवी नुसार मीठ, १ वाटी उभा चिरलेला कोबी, १ वाटी उभे चिरलेले गाजर, १ वाटी उभा चिरलेला कांदा, १/२ वाटी बारीक चिरलेली फरसबी, १ टेबल स्पून काळी मिरी पूड, १/२ टी स्पून साखर, चवी नुसार मीठ, २ टेबल स्पून बारीक चिरलेला लसूण, २ टेबल स्पून बारीक चिरलेली हिरवी मिरची, ४ टेबल स्पून शेजवान चटणी, १ टेबल स्पून सोया सॉस, १ टेबल स्पून चिली सॉस, २ टेबल स्पून टोमॅटो सॉस, २ टेबल स्पून तेल

**कुकिंग सूचना**

गरम गॅस वर एक कढई ठेवून तेल तापवून घ्या. आता त्यात बारीक चिरलेला लसूण बारीक चिरलेली हिरवी मिरची व शेजवान चटणी घालून परतून घ्या. आता त्यात बारीक चिरलेला कांदा घालून परतून घ्या व मग त्यात कोबी गाजर सिमला मिरची फरसबी घालून थोडेसे परतून घ्या व आता त्यात सोया सॉस, चिली सॉस, टोमॅटो सॉस,काळी मिरी पूड मीठ साखर घालून चांगले परतून घ्यावे व झाकण ठेवून भाज्या शिजवून घ्याव्या.

एका ताटात मैदा घेऊन तो मळून घ्या. मळलेल्या मैद्या च्या पिठाची पातळ पोळी लाटून घ्यावी. पोळी तव्यावर फक्त रंग बदलू पर्यंत भाजून घ्यावी. पूर्ण भाजू नये.

अर्धवट भाजलेल्या पोळीवर भाजीचे सारण ठेवून दोन्ही साईड ने दुमडून पोळीचा रोल बंद करून घ्यावा.

आता एका कढईत तळण्यासाठी तेल तापवून हे रोल अलगद सोडा व रोल दोन्ही साईड ने खरपूस तळून घ्यावे.

ह्या रोल चे तिरकस कापून तीन भाग करून घ्यावे. गरम गरम सॉस सोबत सर्व्ह करावे.






प्रा. सोनल रविराव मोरे
केमिस्ट्री विभाग

## रेसिपी सबवे सँडविच

१५ इंचचा गार्लिक रोफु, १०० ग्राम पत्ता कोबी, १ शिमला मिरची, १ गाजर, थोडीशी कांदा पात, गरजेनुसार शेजवान सॉस, २ टेबलस्पून मेयोनीज, १ टी स्पून प्रमाणे चाट मसाला, गार्लिक पावडर, काळी मिरी पावडर, चवी नुसार मीठ, गरजेनुसार बटर, टोमॅटो, पत्ता कोबी, कांदापात

**कुकिंग सूचना**

सर्वात आधी पत्ता कोबी, गाजर, शिमला मिरची चॉप करून घेऊ.

नंतर त्यात मेयॉनीज, काळी मिरी, गार्लिक पावडर, कांद्याची पात, चाट मसाला आणि मीठ टाकून मिक्स करून घेऊ.

आता तीन पीस करून घेऊ. आत मध्ये कट देऊन लो फ्लेमवर तव्यावर बटर टाकून भाजून घेऊ.

नंतर त्यात ब्रेडवर शेजवान सॉस लावून घेऊ. तयार केलेली स्टफिंग लावून घेऊ. वरती टोमॅटोचे पीस पत्ता कोबी बारीक कापलेली व कांद्याची पात टाकून स्टफ करून घेऊ. सॅंडविच तयार करून घेऊ. तुम्हाला आवडत असेल तर चीज स्लाईस टाकू शकता.





**प्रा. सोनल रविराव मोरे**
**केमिस्ट्री विभाग**

## लबाड वांगी

चनाडाळीचे मसाला वांगी

**साहित्य :—**


चना डाळ - अर्धा किलो, कांदे-पाव किलो, ओल नारळ - अर्धी वाटी किस, खसखस, काळा मसाला, लाल तिखट, हळद, मीठ, धना, जिरा पावडर, कोथंबिर, तेल, आलं, लसुन, हिरवी मिरची, चविनुसार साखर, गव्हाचे पिठ, हिंग.

**कृती :—** सर्वात पहिले चनाडाळ चार ते पाच तास भिजत टाकणे नंतर ती मिक्सरमध्ये बारीक वाटायची त्यात आलं लसूण मिरची टाकायची व त्या पिठात मिठ, कोथंबीर हिंग मिक्स करून ठेवायचे. नंतर गव्हाचे पिठ घट्ट मळून मिक्स करून ठेवायचे. नंतर गव्हाचे पिठ घट्ट मळून त्या पिठाचे छोटे गोळे करून पातळ मिश्रण भरायचे. त्यात वरील वाटलेले चना डाळीचे मिश्रण भरायचे. व त्याला वांगीचा आकार द्यायचा असे पाच ते सहा वांगी बनवायचे व ते चाळणीत ठेवून वाफवायचे.

**मासाला :—** कांदे बारीक चिरून ते तेलावर फोडणीस टाकायचे कांदा चांगला नरम झाला की त्यात ओल्या नारळाचा किस टाकायचा व चांगला परतवायचे मग त्यात तिखट, हळद, काळा मसाला, मिठ, कोथंबिर, चविनुसार साखर टाकायची. थोडे धना व जिरा पावडर टाकायची. आणि चांगल मिक्स करून घ्यायचं. त्या वरून खसखस मिक्स करायची.

**वांगी सजावट :—** उकडलेले वांगी मधोमध चार काप देऊन बुडत्या तेलात फ्राय करायचे. नंतर त्यात वरती बनवलेला मसाला भरायचा. व एका प्लेट मधे मसाला भरलेली वांगी ठेवायची. त्यावर थोडी कोथिंबिर आणि ओल्या नारळाचा किस टाकायचा आणि डिश सर्व करायची.

**टिप :—** तुम्हाला चव वाढवायची असेल तर यावर तुम्ही लिंबू टाकून ही खाऊ शकतात.





**मनश्री वाघ**
FYME

# दिवाळीचे महत्व

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण. हा सण सर्व भारत, नेपाळ, सिंगापूर, मलेशिया, श्रीलंका, इंडोनेशिया, मॉरिशिस, सुरीनाम, त्रिनिदाद आणि दक्षिण अफ्रिका मध्ये साजरा केला जातो. लोक एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा देतात आणि फराळ, मिठाई वाटतात. दिवाळीच्या दरम्यान आपण आपली गत काळातील दु:खे विसरून जातो. डोक्यात जे कुविचार भरले गेलेले असतात, ते फटाके वाजवतो आणि सारे काही विसरून जातो. फटाक्यांप्रमाणे गत कुकाळ देखील जळून जातो, नष्ट होतो आणि आपले मन नवीन सुविचारांसाठी परिपक्व बनते. हि खरी दिवाळी होय. फक्त दिवे आणि मेणबत्त्या लाऊन काही होणार नाही तर आपणा प्रत्येकाला आनंदी आणि प्रज्वलित व्हावे लागेल. प्रत्येकाला आनंदी आणि बुध्दीवान बनावे लागेल. बुध्दीमत्तेचा प्रकाश प्रज्वलित करावयाचा आहे. दिव्यांच्या प्रकाशाला ज्ञान रूपी प्रकाश बणवुन त्याचा प्रसार करूया आणि दिवाळीचा हा उत्सव साजरा करूया.[१]

दीपावली म्हणजेच दीप + आवली. दीप म्हणजे दिवा (प्रज्वलित) आणि आवली म्हणजे रांग. प्रज्वलित दिव्यांची रांग लावून केलेली आरास, त्यातून प्रकाशमान झालेला परिसर आणि त्या प्रकाशाने आनंदित होणारा जनसमुदाय. अशी व्याख्या 'दीपावली' ची करता येईल. या दीपावलीच्या निमित्ताने अंत:करणातील अंधार दूर करून सर्वत्र आनंदी व उत्साही वातावरण निर्माण होते. सर्वजण आपल्या सगे—सोयऱ्यांच्या भेटीगाठी घेतात. एकमेकांना शुभेच्छा संदेशासोबतच गोडधोड पदार्थ व फराळ देतात. आपआपसातील मतभेद बाजूला सारून आनंदाने एकत्र येऊन हा सण साजरा करतात.

दीपावलीच्या शोभेत दिव्यांच्या प्रकाशात दारासमोरील रांगोळी, फुलांची तोरणे, मातीचा किल्ला अधिकच भर घालतात. वसुबारस पासून दिवाळीस सुरूवात होते. धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, दीपावली पाडवा नंतर भाऊबीज ने या सणाची सांगता होते. हर्ष आणि उल्हास घेऊन येणारा हा सण सर्वांना त्यांच्या दिनचर्येतून थोडा वेळ आप्तेष्टांसाठी काढण्यास सुसंधी प्रदान करतो.

**घरात लक्ष्मीचा निवास, अंगणी दिव्यांची आरास,**
**मनाचा वाढवी उल्हास, दिवाळी अशी खास...**
**शुभ दीपावली!!!**



**सह. प्रा. सौ. गौरी बोराडे, ग्रंथपाल**

Ref: १) https://www.artofliving.org/in-mr/festivals/diwali/importance-of-diwali



## दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !




Ref: https://www.pinterest.com/pin/482940760061397668/






**डॉ. सौ. श्रद्धा देशपांडे**
प्राचार्या
गोखले एज्युकेशन सोसायटीचे सर डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतन
यांच्या सहकार्याने
"संचितकल्प"
हा तृतीय दिवाळी अंक २०२४ प्रकाशित करण्यात येत आहे.



*"संचितकल्प"* ई दिवाळी अंक हि संकल्पना, आराखडा, मांडणी
— सह. प्रा. सौ. गौरी बोराडे, ग्रंथपाल



मोलाचे सहकार्य
— श्री. प्रथमेश शिंदे, लिपीक

# ॥ ज्ञानदीप लाव जगी ॥

**Gokhale Education Society's**

# SIR DR. M. S. GOSAVI POLYTECHNIC INSTITUTE,

**Nashik Road, Nashik- 422 101**

